दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २५२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● सोमवार दि.१२ डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com


### केंद्र शासन पुरस्कृत अमृत २ अभियान

# पनवेल महानगरपालिकेच्या मलनिस्सारण प्रकल्पास ५०.३० कोटीची प्रशासकीय मान्यता

## उत्तम प्रशासक तथा आयुक्त गणेश देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**केंद्र शासन पुरस्कृत अमृत २ योजनेंतर्गत समाविष्ट असलेल्या राज्यातील ४४ शहरांमध्ये पनवेल महानगरपालिकेचा समावेश असून या अभियानांतर्गत पाणी पुरवठा, सरोवरांचे पुर्नजीवन व हरिक्षेत्र विकास इत्यादी पायाभूत सुविधांची निर्मिती राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये करण्यात येते. यामध्ये पनवेल महानगरपालिकेच्या मलनिस्सारण प्रकल्पाचा समावेश आहे. त्यानुसार नुकत्याच झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत पनवेल महानगरपालिकेच्या मलनिस्सारण प्रकल्पासाठी ५०.३० कोटीची मान्यता देण्यात आली आहे.**



पनवेल नगरपालिकेचे ऑक्टोबर २०१६ मध्ये महापालिकेत रुपांतर झाल्यानंतर गेल्या ५ वर्षाच्या कालावधीमध्ये विविध विकासकामे युद्ध पातळीवर सुरू करण्यात आली. यामध्ये आयुक्त गणेश देशमुख यांच्या कार्यकाळात आतापर्यंत सर्वाधिक विकासकामे पूर्णत्वास येत आहेत. उत्तम प्रशासक असलेल्या आयुक्त गणेश देशमुख यांनी आपल्या प्रशासकीय अनुभवाच्या जोरावर स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांची उत्तम सांगड घालून अनेक महत्वाकांक्षी योजना पूर्णत्वास नेण्यास यश मिळविले. दरम्यान केंद्र शासनाच्या अमृत २ योजनेंतर्गत पनवेल महानगरपालिकेस मंजूर ५०.३४ कोटी निधीपैकी केंद्र सरकार १६.७८ कोटी तर राज्य शासनाकडून १८.४६ कोटी रुपये तर यासाठी महानगरपालिका १५.१० कोटी रुपये निधी देणार आहे.

या व्यतिरिक्त अजूनही सुमारे ४०० कोटींची कामे प्रस्तावित असून लवकरच त्या कामांसाठी प्रशासकीय मान्यता मिळेल असा विश्वास आयुक्त गणेश देशमुख यांनी व्यक्त केला. यामध्ये नव्याने स्थापन झालेल्या पनवेल महानगरपालिकेतील समाविष्ट २९ गावांसाठी २०७ कोटीची भूमींतर्गत गटार योजना तसेच या सर्व २९ गावांसाठी १४४ कोटीची पाणी पुरवठा योजना, पिसार्वे येथील तलाव सुशोभिकरणासाठी १७ कोटी तसेच नवीन पाणी पुरवठा मीटरसाठी १८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### १७ डिसेंबरला मुंबईतील मोर्चाला

# पनवेल-उरण मविआतील ५ हजार कार्यकर्ते सहभागी होणार

## पनवेल-उरण महाविकास आघाडीच्या बैठकीत नियोजन पूर्ण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

छत्रपती शिवाजी महाराजांबाबत राज्यपाल, भाजपचे प्रवक्ते आणि नेत्यांकडून वारंवार होत असलेली अवमानजनक वक्तव्ये, कर्नाटक-महाराष्ट्र सीमावाद प्रश्न याबाबत राज्य सरकारने घेतलेल्या बोटचेपी भूमिकेविरोधात महाविकास आघाडीच्या वतीने १७ डिसेंबर रोजी मुंबईत मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली असून राज्यभरातून महाविकास आघाडीतील किमान ५ लाख नेतेमंडळी, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक या मोर्चात सहभागी होणार आहेत. या धर्तीवर पनवेल-उरण महाविकास आघाडीतील जवळपास ५ हजार पदाधिकारी व कार्यकर्ते पनवेलहुन मुंबईकडे रेल्वेने प्रवास करून जाणार आहेत. महाविकास आघाडीतील घटकपक्ष, मित्रपक्ष, संघटना यांच्याकडून याबाबत नियोजन पूर्ण केले जात असल्याची माहिती शेकापचे आमदार बाळाराम पाटील यांनी दिली. ते आज (शनिवार दि.१० डिसेंबर) पनवेलमधील शेतकरी कामगार पक्ष कार्यालयात पनवेल-उरण महाविकास आघाडीच्या बैठकीदरम्यान बोलत होते.

या दरम्यान महाविकास आघाडीतील सर्व घटकपक्षांचे झेंडे हाती घेऊन पनवेल, मानसरोवर, खारघर रेल्वे स्थानकातून प्रवासाला सुरुवात होणार असून मोठ्या संख्येने कार्यकर्ते मुंबईतील मोर्चासाठी सहभागी होतील या दृष्टिकोनातून पनवेल-उरण महाविकास आघाडीच्या माध्यमातून नियोजन केले जात आहे. १७ डिसेंबरला सकाळी ९:३० वाजता पनवेल रेल्वे स्थानकातून रेल्वेने महाविकास आघाडीतील पदाधिकारी व कार्यकर्ते मुंबईच्या दिशेने प्रयाण करणार असून भायखळा येथील जिजामाता उद्यानात एकत्र जमण्याचा निर्णय घेण्यात आल्याचेही आमदार बाळाराम पाटील यावेळी म्हणाले.

त्याचबरोबर पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कराविरोधात १३ ते २१ डिसेंबरला महाविकास आघाडीतील घटकपक्ष, ९५ गाव संघर्ष समिती व विविध सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमान बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या धरणे आंदोलनाच्या माध्यमातून पनवेलमधील जनतेला दिलासा देण्याचा आमचा प्रयत्न असल्याची प्रतिक्रियाही आमदार बाळाराम पाटील यांनी यावेळी व्यक्त केली. याप्रसंगी पनवेल-उरण महाविकास आघाडीचे अध्यक्ष बबनदादा पाटील, माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, काँग्रेसचे जेष्ठ नेते आर सी घरत, माजी पं.स. सभापती काशिनाथ पाटील, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटील, युवक काँग्रेसचे पनवेल शहर जिल्हाध्यक्ष हेमराज म्हात्रे, राष्ट्रवादीचे नेते राजकुमार पाटील, माजी उपसभापती राजेश केणी, एकनाथ म्हात्रे यांच्यासह आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते समृद्धी महामार्गाचे लोकार्पण




**नागपूर । वृत्तसंस्था**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गासहित विविध ११ विकासकामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेदेखील उपस्थित होते.

देशाच्या सर्वांगीण विकासात तेथील पायाभूत सुविधा प्रकल्प हे विशेष भूमिका बजावतात. नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्ग हा महाराष्ट्राच्या विकासाला नवी गती देईल असे विश्वासपूर्ण गौरवोद्गार यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. राज्यात डबल इंजिन सरकार कार्यरत झाल्यानंतर किती गतिमानतेने काम करत आहे,



याचेच हे उदाहरण असल्याचे मत त्यांनी याप्रसंगी बोलताना व्यक्त केले. वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव या महामार्गाला दिले याचा मला विशेष आनंद होतो, असे मत त्यांनी यासमयी व्यक्त केले.

समृद्धी महामार्गाचे लोकार्पण होणे ही माझ्यासाठी आनंदाची आणि अभिमानाची बाब असल्याचे यावेळी बोलताना स्पष्ट केले.

आज हा समृद्धीमहामार्ग लोकांच्या सेवेत आणताना हा महामार्ग राज्यातील गोंदिया, भंडारा, गडचिरोली आणि नांदेड या जिल्ह्यांनाही जोडण्यात येणार असल्याचे याप्रसंगी बोलताना अधोरेखित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी कायमच आम्हाला चांगले काम करायला प्रेरणा दिली असून तुमचा आशीर्वाद पाठीशी असेल तर यापुढे देखील उत्तम काम करू अशी ग्वाही यासमयी बोलताना दिली.

याप्रसंगी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ.भारती पवार, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

### उरण वनविभागाच्या हद्दीतून विनापरवाना डेब्रीजची वाहतूक

# १६ डंपरवर जप्तीची कारवाई केल्याने डेब्रिज माफियांचे धाबे दणाणले

**दै.रायगड नगरी । उरण**

गव्हाण - बेलपाडा वनविभागाच्या हद्दीतुन विनापरवाना डेब्रीजची वाहतूक करणाऱ्या मुंबईतील १६ डंपर उरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी कारवाई करीत जप्त केले आहेत. उरण - पनवेल परिसरातील अनेक ठिकाणी मुंबईतील डेब्रिज मोठ्या प्रमाणावर आणून कुठेही कधीही टाकले जात आहे. डेब्रीज टाकण्याचे प्रकार मागील दिड दोन वर्षांपासून सुरू आहे. याशिवाय गव्हाणफाटा - चिरनेर मार्गांवरील गव्हाण फाट्यापासून ते वाघधोंडीच्या खिंडीत भर रस्त्यावर डेब्रिज टाकत असल्याने याबाबत अनेक ग्रामपंचायत, सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते, नागरिकांनी तहसिलपासुन, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी, जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त आणि पर्यावरण विभागाकडे अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत.

मात्र कारवाईसाठी संबंधित सर्वच विभागाच्या अधिकाऱ्यांकडून परस्परांकडे बोटे दाखवून दुर्लक्ष करीत आहेत. शासकीय अधिकाऱ्यांच्या बोटचेपी धोरणामुळे मात्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. काल रात्रीच्या सुमारास गव्हाण - बेलपाडा वनविभागाच्या हद्दीतुन विनापरवाना डेब्रीजची वाहतूक केली जात असल्याची माहिती उरण वनविभागाचे वनक्षेत्रपाल नथुराम कोकरे यांना मिळाली होती. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी रात्रीच्या सुमारास पथकासह जाऊन पाहणी केली असता वनविभागाच्या हद्दीतुन विनापरवाना डेब्रीजची वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले होते.

वनविभागाच्या हद्दीतुन विनापरवाना वाहतूक करणाऱ्या १६ डंपर अडवून कारवाई करित काल रात्री जप्त करण्यात आले आहेत. हे सर्व डंपर मुंबईतुन डेब्रिज घेऊन आले होते. वनविभागाच्या हद्दीतुन विनापरवाना वाहतूक केल्यानेच कारवाई करण्यात आली असल्याची माहिती उरण वनविभागाचे वनक्षेत्रपाल नथुराम कोकरे यांनी दिली आहे.

या मुंबईतून टाकवू कचरा असलेले डेब्रिज घेऊन येणाऱ्या डंपरवर जप्तीची कारवाई झाल्याने डेब्रिज टाकणाऱ्यांना चाब लागणार आहे. त्यामुळे पर्यावरण चिंतकांनी समाधान केले असून,डेब्रिज माफियांचे धाबे दणाणले आहेत.

# संरक्षक कठडे पाईप तुटल्याने नांदगाव रस्त्यावरील मोरीची दुरावस्था

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

साळाव-मुरुड रस्त्यावर नांदगाव हायस्कूल नजिक असलेल्या मोरीचे संरक्षक कठडे पाईप तुटून पार दुरावस्था झालेली असून याकडे संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या असलेल्या दुर्लक्षाबाबत नाराजी व्यक्त होत असून तातडीने मोरी दुरुस्तीची मागणी वाहनचालक व नागरिकांतून जोर धरीत आहे.

मुरुडला पर्यटनाचा दर्जा प्राप्त झाल्यापासून साळाव -मुरुड रस्त्यावर कोर्लई, काशिद बीच तसेच मुरुड जंजिरा किल्ला पाहण्यासाठी पर्यटकांच्या विशेष करून शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी वाहनांच्या दुतर्फा रांगा लागलेल्या असतात. वेळप्रसंगी अनेक वेळा ट्रॅफिक जॅम ला सामोरे जावे लागत असून त्रास सहन करावा लागतो. या रस्त्यावर नांदगाव हायस्कूल नजिक असलेल्या मोरीचे रुंदी करण करुन नव्याने बांधकाम होणे गरजेचे आहे. येथील मोरी अरुंद असल्याने तसेच पुणे, मुंबई, नाशिक अन्य ठिकाणाहून येणाऱ्या पर्यटकांना येथील रस्त्याचा अंदाज नसल्याने परिणामी अपघाताला सामोरे जावे लागते.



# नवव्या मजल्यावरून खाली पडून मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वारदोली येथे काम सुरू असलेल्या इमारतीच्या नवव्या मजल्यावरून खिडकीतून खाली पडून ५३ वर्षीय कामगाराचा मृत्यू झाल्या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात कॅपॅसाईट इन्फ्रा कंपनीचे मॅनेजर मनोज किसन जाधव व वाधवा कंपनीचे सेफ्टी इन्चार्ज गणेश बाबुराव यादव यांच्याविरोधात कलम ३०४ (अ)प्रमाने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयत इसम बलराम जगराम वर्मा हा टुलिप ए/१ टॉवर या बिल्डिंग बांधकाम साईट, वाधवा वाईस सिटी, वारदोली येथे नवव्या मजल्यावर काम करत होता. यातील मनोज जाधव व वाधवा कंपनीचे सेफ्टी इन्चार्ज गणेश यादव यांनी इमारतीच्या पश्चिमेस बाहेरील बाजूस कामगार व साहित्य ने आण करण्याकरता लिफ्ट लावली होती. व प्रत्येक माळ्यावर एका खिडकीचे काम पूर्ण केलेले नाही.

खिडकीच्या चौकटीला सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक असलेले बॅरिकेटिंग डोअर न लावल्याने बलराम वर्मा हा नवव्या मजल्यावर खिडकीतून खाली पडून जखमी झाला व त्याचा मृत्यू झाला.

# कामगारांसाठी आ.प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन

## सोमवारी कामगार आयुक्त कार्यालयात संयुक्त बैठक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आजिवली गावस्थित असलेल्या आयरन माउंटन कंपनीने कामगारांना कामावरून कमी केल्याने त्या विरोधात भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी रास्ता रोको आंदोलन करत कंपनी व्यवस्थापनाला इशारा दिला. त्यामुळे कामगारांच्या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी कामगार उपआयुक्त यांच्यासमवेत व्यवस्थापन आणि पोलीस प्रशासनाची बैठक होणार असून कामगारांना कामावर पूर्ववत घ्या नाही तर या पेक्षा मोठे आंदोलन करण्याचा गर्भित इशारा आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिला.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात भाजपचे तालुका सरचिटणीस व माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत, ज्येष्ठ कार्यकर्ते सुभाष पाटील, आप्पा भागीत, राम गोजे, भाजपचे गुळसुंदे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, युवा नेते अनिल पाटील, तानाजी पाटील, शिवाजी माळी, प्रवीण ठाकूर, महेंद्र गोजे, अनंतबुवा पाटील, रवी शेळके, संदेश गोजे, यांच्यासह



कार्यकर्ते आणि ग्रामस्थ शेकडोंच्या संख्येने सहभागी झाले होते.

आयरन माऊंटन या कंपनीमध्ये काम करणाऱ्या स्थानिक कामगारांना अचानकपणे व्यवस्थपणाने कामावरून कमी करत बेरोजगार केले आहे. त्यामुळे या कामगारांना पूर्ववत कामावर न घेतल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. कंपनी व्यवस्थापनाने या संदर्भात दुर्लक्ष केल्याने आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत शेकडो कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि कामगारांनी जुना मुंबई पुणे महामार्गावर ठिय्या आंदोलन केले. आणि जो पर्यंत कामगारांचा प्रश्न निकाली लागत नाही तो पर्यंत हटणार नाही असा इशारा यावेळी देतानाच घोषणांनी आसमंत दणाणला होता. यावेळी वाहतुकीची मोठी रांग या महामार्गावर लागली होती. आंदोलनाचे स्वरूप तीव्र होण्याचे चित्र दिसताच पोलीस प्रशासनाने यामध्ये मध्यस्थी केली. त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना आंदोलन मागे घेण्यास सांगितले. मात्र जो पर्यंत कामगारांना कामावर पूर्ववत करीत नाही तो पर्यंत जागेवरून हलणार नसल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्पष्ट केले. अखेर पोलिसांनी या संदर्भात व्यवस्थापनासोबत बैठक घेण्याचे आश्वासन दिले. त्या अनुषंगाने सोमवारी खांदा कॉलनी येथे असलेल्या सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत कामगार आयुक्त, व्यवस्थापन अधिकारी व पोलीस प्रशासन यांची हि बैठक घेण्याचे मान्य झाले आहे, आणि त्यानुसार आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आल्याची घोषणा यावेळी करण्यात आली. मात्र कामगारांना न्याय मिळवून दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा इशारा आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिला आहे.

# चिरनेर महागणपती चरणी नतमस्तक होण्यासाठी संकष्ट चतुर्थी निमित्ताने भक्तगणांची गर्दी

**दै.रायगड नगरी । उरण**

हजारो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या चिरनेर गावातील श्री महागणपती चरणी नतमस्तक होण्याचा योग भाविकांसाठी काल आलेल्या संकष्ट चतुर्थी निमित्ताने जुळून आला. त्यामुळे श्री महागणपती चिरनेर चरणी नतमस्तक होण्यासाठी नवीमुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, पनवेल, पेण व उरण येथील अनेक भक्तांनी आप आपल्या कुटुंबासह मंदिरात श्रीच्या दर्शनासाठी गर्दी केल्याचे चित्र पहावयास मिळत होते. तसेच उरण तालुक्यातील १७ ग्रामपंचायतीच्या निवडणुका या १८ डिसेंबर २०२२ रोजी पार पडणार असल्याने ग्रामपंचायत उमेदवारा समवेत राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी व भक्तगणांनी श्रींच्या



चरणी दर्शनासाठी गर्दी केली होती.

उरण तालुक्यातील चिरनेर या गावावर निसर्ग देवतेची अविरत कृपा आहे. या गावातील जनतेने २५ सप्टेंबर १९३० साली ब्रिटिश सरकार विरोधात सत्याग्रह पुकारुण देशाच्या स्वातंत्र्यासाठी गावकऱ्यांनी हुतात्म्ये पत्करले होते. गावात असणारे महा-गणपती देवस्थान चिरनेर गावचे ग्रामदैवत आहे. शिलाहार राजवटीत निर्मिलेले महागणपती मंदिर ततत्कालीन मुस्लिम आक्रमकांनी उध्वस्त केले. मात्र तत्पूर्वी गणेशभक्तांनी महागणपतीची मूर्ती मंदिरा जवळील तलावात सुरक्षित लपवून ठेवली होती.तद्नंतर पेशव्यांचे सरदार रामजी महादेव फडके यांना देवाने स्वप्नात येऊन मला तलावातून बाहेर काढ असे सांगितले.त्याप्रमाणे त्यांनी तलावाचे खोदकाम करून मूर्ती बाहेर काढली. आणि नविन पाषाणी भव्य मंदिरात मूर्तीची प्रतिष्ठापणा केली.

महागणपतीचे मंदिर पाषाणी, गोल घुमटाचे असून पूर्वाभिमुख आहे. मंदिरात स्थानापन्न असलेली महा-गणपतीची मूर्ती भव्य, चतुर्भुज, शेंदूर चर्चित असून पद्मासनात बसलेली आहे. मूर्तीच्या हाती खड्ग व पाश आहेत. मूर्ती सुमारे सहा फूट उंच व साडेतीन फूट रुंद आहे.

नवसाला पावणारा गणपती म्हणून चिरनेर गावातील महागणपतीची ख्याती सर्वदूर पसरली आहे.या गणेशाच्या दर्शनाला व हुतात्म्यांच्या बलिदानातून पावन झालेल्या भूमीचे दर्शन घेण्यासाठी नेहमीच भाविकांची व पर्यटकांची गर्दी होत असते.अशा लाडक्या श्रींच्या चरणी नतमस्तक होण्याच भाग्य हे या वर्षातील शेवटच्या संकष्ट चतुर्थी निमित्ताने आलेल्या रविवारच्या सुट्टीच्या दिवशी जुळून आला.

# माथेरानच्या विकासाला पर्यटकांची पसंती



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये मागील काही वर्षांमध्ये अनेक पर्यटन पूरक विकास कामे सुरू आहेत ज्यामुळे माथेरानच्या सौंदर्यात अधिक भर पडत आहे येथील वाहतूक व्यवस्थेचे मोठा बदल झाल्याने पर्यटकांची उत्तम सोय होत असल्याने येणारे पर्यटक एक चांगला अनुभव घेऊन जाताना दिसत आहेत.

माथेरान मध्ये अनेक वर्षापासून दगड मातीच्या लाल रस्त्याने पर्यटकांना भुरळ घातली होती परंतु या रस्त्यांवरून उडणाऱ्या मातीने स्थानिकांना अनेक श्वसन विकाराच्या समस्यांना सामोरे जावे लागत होते त्यामुळेच येथील नागरिकांनी पर्यावरण पूरक धूळ विरहित रस्ते असावे अशी अनेक वर्षांपासून मागणी केली होती व त्यास यश येत माथेरान सनियंत्रण समितीने येथील दगड मातीच्या रस्त्यांकरिता पर्यावरण पूरक क्ले पेवर ब्लॉक हा पर्याय सुचविला होता व त्यानुसार येथील बहुतेक रस्ते ब्लॉक ने बनविण्याचे काम सुरू आहे त्यामुळे येथील व्यवसायिकांना धुळीपासून सुटका मिळालीच आहे परंतु रस्ते ही स्वच्छ व चकाचक असल्याने पर्यटकांचे समाधान होत आहे. लीद मिश्रित माती जंगलामध्ये मिळत असल्याने येथील वनसंपदा ही धोक्यात आली होती तिलाही संरक्षण मिळाले असून रस्त्यालगत असलेल्या लहान मोठ्या झाडाझुडपांनाही संरक्षण मिळाले आहे व ही झाडे हिरवीगार झालेले दिसून येत आहेत.

माथेरानच्या पर्यटनामध्ये सर्वात मोठा बदल झालेला रिक्षाच्या स्वरूपातून आपणास पाहावयास मिळाला बॅटरीवर चालणाऱ्या या रिक्षांमुळे प्रदूषण तर होत नाही पण पर्यटकांना स्वस्त व जलद प्रवास होत असल्याने पर्यटकांची रिक्षा ही पहिली पसंती ठरत आहे त्यामुळेच ही रिक्षासाठी लांबच्या लांब रांग दिसून येतात माथेरान मध्ये सध्या मिनी ट्रेन ही पूर्ण ताकदीनिशी धावत आहे नेरळ हून सुटणाऱ्या नेरळ माथेरान साठी दोन गाड्या नेहमीच फुल धावत असल्याने पर्यटकांची मिनी ट्रेन पहिली पसंती ठरत आहे. तर आम्हाला अमन लॉज ते माथेरान या दरम्यान धावणाऱ्या शटल सेवेस ही पर्यटकांचा प्रचंड प्रतिसाद लाभत आहे मुळे तोट्यात असलेली मध्य रेल्वे सेवा ही फायद्यात आल्याने याकडे रेल्वे प्रशासन जातीने लक्ष देत असल्याने पर्यटकांना एक चांगली सुविधा रेल्वेच्या स्वरूपाने मिळत असल्याने येणारे पर्यटकही खुश आहेत.

आता फक्त पर्यायी रस्ता व वाहनतळ यांच्यामध्ये सुधारणा झाल्यास माथेरान मध्ये पर्यटक वाढीस मदत होणार आहे नेरळ माथेरान रस्त्याला नेहमीच प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडीस पर्यटकांना सामोरे जावे लागते तर अपुरी वा-हनतळ व्यवस्थेमुळे पर्यटकांचा खूप वेळ वाया जात असल्यामुळे माथेरान करिता पर्यायी वाहतूक सुसज्ञ मार्ग व वाहनतळ व्यवस्था असावी अशी मागणी माथेरान करांची आहे.

# माणगांव नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत मानवी हक्क दिन उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

दरवर्षी १० डिसेंबर हा दिवस मानवी हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. मानवी हक्क संरक्षण कायद्या मधील कलम १२ अन्वये मानवी हक्काबाबत जनजागृती करणे हा मानवी हक्क आयोगाचा महत्वपूर्ण अविभाज्य भाग आहे. या कायद्या अंतर्गत समाजातील तळागाळा पर्यंत जनतेला मानवी हक्कांचे ज्ञान माहीत होणे व त्याबद्दल जनजागृती होणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून माणगांव नगरपंचायत प्रशासनामार्फत शनिवार दिनांक १० डिसेंबर रोजी सकाळी ०८.०० वाजता माणगांव शहरांत प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले.




यावेळी माणगांव नगरपंचायतचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार व मुख्याधिकारी संतोष माळी, उप-नगराध्यक्ष सचिन बोंबले, पाणी पुरवठा सभापती राजेश मेहता, नगर सेवक दिनेश रातवडकर स्वीकृत नगरसेवक हेमंत शेठ, ज्युनियर इंजिनियर आकाश बुवा, कार्यालयीन निरिक्षक रामदास पवार, सिटी को-ऑर्डीनेटर अतुल जाधव तसेच अशोक दादा साबळे विद्यालयाचे मुख्याध्यापक धनाजी जाधव, मिलींद गायकवाड सर, यांच्या उपस्थितीत नगरपंचायत महिला व पुरुष कर्मचारी, शिक्षकवृंद व शालेय विद्यार्थ्यांनी मानवी हक्क दिनाचे जनजागृतीपर फलक घेऊन माणगांव शहरात प्रभातफेरी काढुन मोठ्या उत्साहात मानवी हक्क दिन साजरा करण्यात आला.

# टायर चोरट्यास पनवेल शहर पोलिसांनी केले गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नादुरुस्त ट्रेलरचे वीस टायर बाजूला काढून ठेवले असता त्या टायर पैकी दोन टायर चोरणाऱ्या ट्रेलर चालकास पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदाराच्या सहाय्याने अटक केली आहे.

पनवेल जवळील पंकज पार्किंग जेएनपीटी रोड या ठिकाणी ट्रान्सपोर्टर जितेंद्र गुप्ता यांनी त्यांचा एक ट्रेलर दुरुस्तीचे काम चालू असल्याने वीस टायर बाजूला काढून ठेवले होते. यावेळी आरोपी ट्रेलर चालक रोमी डॅनियल गिल (वय ४६, रा. सुरत) याने त्या टायर पैकी दोन टायर ज्याची किंमत जवळपास ३६ हजार इतकी आहे ते चोरून नेले होते. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि अभयसिंह शिंदे, पोहवा रविंद्र राऊत, पोना परेश म्हात्रे, पोना महेंद्र वायकर, पोना रविंद्र पारधी, पोना विनोद देशमुख, पोशि प्रसाद घरत आदींच्या पथकाने तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदाराच्या सहाय्याने आरोपी रोमी डॅनियल गिल याला उरण परिसरातुन अटक केली.

# पनवेलमधील लंपीमुळे तिसऱ्या जनावराचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनावरांना होणारा लंपी आजाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले असल्याचे दिसून येत आहे. पनवेल तालुक्यात लंपी आजारामुळे तिसऱ्या जनावरांचा मृत्यू झाला आहे. यातील बाळाराम कमलाकर फडके, पाले खुर्द यांचा बैल मेल्याप्रकरणी शासनाकडून २५ हजारांची तर विष्णू गोपाळ डोंगरे, पाले खुर्द याना १६ हजारांची मदत करण्यात आली आहे.

पनवेल तालुक्यात देखील लम्पिचे प्रमाण वाढू लागलेले दिसून येत आहे. दोन दिवसांपूर्वी नेरे पाडा येथील रामदास खुटले यांचा वासरुचा लम्पि आजारामुळे मृत्यू झाला आहे. त्यामुळे लम्पि आजारात मृत्युमुखी पडलेल्या जनावरांची संख्या पनवेलमध्ये तीन झाली आहे. लम्पिचा विळखा घट्ट होत चाललेला आहे. पनवेल मध्ये शंभर टक्के जनावरांना लसीकरण करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत दोन ते तीन जनावरांना लम्पिची लागण झाली असल्याची माहिती पशु विभागातर्फे देण्यात आली.

# बाळासाहेब ठाकरे विधी महाविद्यालय तळोजा येथे मानवी हक्क दिन साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

मानवी हक्क म्हणजे भारतीय राज्य घटनेने दिलेले जगण्याचे प्रभावी साधन आहे. या हक्क दिनाला उज-ाळा देताना ,तळोजा येथील बाळासाहेब ठाकरे विधी महाविद्यालयात मानवी हक्क दिन साजरा करण्यात आला. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेश साखरे यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला.व मानवी हक्कांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले

मानवी हक्क दिन म्हणजे जन्माला येणार्या प्रत्येकाला जे नैसर्गीक हक्क आहेत असे हक्क ज्यांच्या मूळे प्रत्येक मानवाला आपले जिवन जगणे सूकर जाते. त्यामूळे मानवी हक्क दिनाला खूप महत्व आहे.त्या मानवी हक्कांची जाणीव भावी वकिलांना व्हावी व मानवी हक्कांना उजाळा मिळावा या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन बाळासाहेब ठाकरे विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेश साखरे यांनी केले होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ साखरे म्हणाले, तुम्ही सर्व विद्यार्थी जे भावी वकिल,विधीतज्ञ, न्यायाधीश आहात त्यांनी मानवी हक्कांचे मूल्य जाणून ,त्यांचे संवर्धन करणे गरजेच आहे. यावेळी महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी मानवी हक्कांबाबत आपली मतं मांडली.व मानवी हक्कांचे जतन करण्यासाठी कोणती उपाययोजना करावी याबद्दल आपल्या कल्पना विषद केल्या.


## PUBLIC NOTICE

**NOTICE** is given, hereby, to all persons, (both natural and legal), that my client namely Richa Sanit Khanavkar R/O.Navade, District-Raigad, is exclusive owner and possessor of the flat, described in the SCHEDULE below and referred to hereinafter, for the sake of brevity, as **'the said flat'.**

My abovenamed client did purchase the said flat, from Mr.Lalchand Chunaram Mourya, vide registered sale deed dated 28.10.2022 On the very day Mr.Lalchand Mourya delivered the vacant possession of the said flat to my abovenamed client. Since 28.10.2022 my said client has been residing in the said flat, in the capacity of exclusive owner and possessor of the said flat.

My abovenamed client has paid entire agreed consideration of the said flat to its seller i.e.Mr.Lalchand Mourya. The seller of the said i.e.Mr.Lalchand Mourya is bound to deliver to my client all documents of title with respect to the said flat, as per the statutory provisions laid down in sub-section 3 of Section 55 of The Transfer of Property Act, 1882. However, those documents are yet to be delivered to my abovenamed client on the part of Mr.Lalchand Mourya. My Client has reasonable apprehension that any of those documents may be used for unlawful purpose.

Hence, by this public notice all persons are alerted and called up on further not to enter with any kinds of transactions, dealings or transfers with respect to the said flat i.e. the flat described in following Schedule.

**SCHEDULE OF ABOVE SAID FLAT**

A Flat, bearing flat No.202, admeasuring 47.97 Sq. Meters (511.07 Sq. feet) carpet area, situated at second floor of "A" wing of the building and registered Society namely 'NAVADE VASANI RESIDENCY Co-Operative Housing Society Limited', which is constructed on the plot, bearing plot No.158, phase II, within the limits of Navade, of Taluka Panvel in District Raigad, (Maharashtra).

Dated : 07/12/2022

Sd/-
**M.B.Patil**
(Advocate)

903, 'Atlas Tower',
near 'Dabba Garam' Hotel,
Haware City Road, Boriwade,
Kasarvadvali-Thane (W) 400615



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे अशिलाने प्रस्ताविक जमीन मालक १) कोंडीराम राजाराम म्हात्रे २) गणेश एकनाथ भोईर, ३) गुलाब विष्णू भोईर, ४) छाया विश्वास मेढेकर ५) जयदास कृष्णा भोईर, ६) ज्योती जुगनु खुटले, ७) ताराबाई एकनाथ भोईर, ८) दिनकर राजाराम म्हात्रे, ९) धोंडीराम राजाराम म्हात्रे, १०) पदीबाई शिवाजी म्हसकर, ११) बयव उर्फ बयोबाई तुकाराम म्हात्रे, १२) मंदाबाई सिताराम पाटील, १३) राधाबाई कृष्णा भोइर, १४) रोहिदास एकनाथ भोईर, १५) विजय परशुराम भोईर, १६) अशोक राजाराम म्हात्रे, १७) श्याम कृष्णा भोईर, १८) सुनील कृष्णा भोईर, १९) सुरेश कृष्णा भोईर, २०) संगीता सोमनाथ पाटील, २१) संतोष एकनाथ भोईर, २२) हरिश्चंद्र हिरु भोईर, २३) शांताराम परशुराम भोईर, २४) कुंडलिक उर्फ पुंडलिक हिरु भोईर, २५) मारुती गोमा भोईर या जमीन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर जमीन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नांदगांव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | भूमापन नं./ उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
| --- | --- | --- | --- |
| नांदगाव | २८/६ | ०-६०-७० पो.ख. ०-०८-६० एकूण ०-६९-३० | १२.५६ |
| नांदगाव | २९/२ | ०-९५-८० पो.ख.०-०९-९० एकूण १-०५-७० पैकी ०-७०-०० विक्री | १५.६१ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १०/१२/२०२२

सही/-
**ॲड.श्री.दिपक आर.शेळके**
**डी-३/१, किनारा हौ.सो., बावन बंगलो,**
**ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९८२०७९५६०५**



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, श्री.हसुराम धाया उर्फ धाऊ म्हात्रे यांची मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील जमीन मिळकत नवी मुंबई प्रकल्पांतर्गत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामांसाठी संपादीत झाली असून त्याचा निवाडा प्रकरण क्रमांक ओवळे युनिट केस क्र.८३ ने जाहीर झालेला आहे.

सदरहू जमीन मिळकतीचे संपादनाचे नुकसान भरपाईपोटी शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) ने श्री.हसुराम धाया उर्फ धाऊ म्हात्रे यांना भूखंडाचे वाटप केलेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| नोड | भूखंड क्रमांक | सेक्टर क्रमांक | क्षेत्रफळ चौ.मी. |
| --- | --- | --- | --- |
| पुष्पक (दापोली), ता.पनवेल, जि.रायगड | ३८१ | ३ | ४२० |

उपरोक्त नमूद केलेल्या भूखंडासंबंधी सिडको महामंडळासोबत ॲग्रीमेंट टु लिज दिनांक २९/०६/२०१८ या दिवशी निष्पादीत केलेला असून दिनांक १३/१२/२०१८ या दिवशी सह दुय्यम निबंधक पनवेल यांचकडे दस्त क्र.पवल-३/१४२४३/२०१८ ने नोंदणीकृत केलेला आहे.

माझे अशिल मे.ड्रीम होमस् क्रिएटर्स बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) कुमारी स्वराली दत्तात्रेय शिंदे २) श्री.मुकेश जनार्दन खोत ३) श्री.ज्ञानेश्वर दामोदर पाटील पत्ता : निहारिका मिरेज, कार्यालय क्रमांक ३०५, भूखंड क्रमांक २७४, सेक्टर १०, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड हे उपरोक्त नमूद भूखंडापैकी ५० टक्के अविभक्त हिस्सा त्यातील सर्व हक्क व हितसंबंधासहीत त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करून घेण्याच्या विचारात आहेत.

तरी सदर जमीन मिळकतीचे अथवा सदर भूखंडाचे बाबतीत अथवा त्याच्या कोणत्याही हिश्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा, कोणत्याही प्रकारची बुकींग वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून माझे अशिल सदर भूखंडापैकी ५० टक्के अविभक्त हिस्सा त्यातील हक्क हितसंबंधासहीत त्रिपक्षीय कराराद्वारे हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : ओवळे, पनवेल
दिनांक : १२/१२/२०२२

सही/-
**ॲड.जितेंद्र परशुराम म्हात्रे**
**मु.ओवळे, पो.पारगाव,**
**ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
advjitendramhatre@gmail.com


# शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शन शिबिर उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब**

नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेच्या श्रमिक विद्यालय चिल्हे येथे इ.८ वी शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शन शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले.

वा.ना. दांडेकर जन्मशताब्दी वर्षानिमित्त वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र, ज्ञान प्रबोधिनी पुणे व एक्सेल उद्योग समूह, रोहा तसेच माध्यमिक मुख्याध्यापक संघ, रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन ज्ञान प्रबोधिनी मुख्य मार्गदर्शक ओंकार बाणाईत यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आसावरी चंद्रचूड, वृषाली फणसळकर, प्रज्ञा पाटील, दीपक कांबळे, तालुका मुख्याध्यापक संघाचे नितिन गोरिवले, विनय मार्गे, दीपक जगताप, भागेश ढोले, दडवे, प्रसाद भोईर आदी मान्यवर उपस्थित होते.

तालुक्यातील सर्व माध्यमिक शाळांसाठी इ. ८ वी शिष्यवृत्ती परीक्षा शिक्षक मार्गदर्शन वर्गासाठी आयोजित करण्यात आलेल्या या मार्गदर्शन शिबिरात गणित, भाषा, बुद्धिमत्ता आदी विषयांबाबत तज्ञ मार्गदर्शक आसावरी चंद्रचूड, वृषाली फणसळकर, प्रज्ञा पाटील, ओंकार बाणाईत व दीपक कांबळे यांनी बहुमोल मार्गदर्शन केले.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण "ना हरकत पत्र" मागणी अर्जानुसार नोटीस **श्री. सुनिल दत्तत्रय जगे व इतर ४, राहणार - रुम नं. २०९, सनफ्लॉवर सी.एच.एस., पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड**
**......(अर्जदार)**

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे **मे. मॅट्रीक्स इन्फ्रा तर्फे राहूल गणेश मेहता व इतर** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता **"ना हरकत प्रमाणपत्रासाठी"** मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| १४१८ | २१.०९.२०२२ | पुष्पक नोड (उलवे) | २६ | २५ | ५८० | ०५.०४.२०२२ | १२.०५.२०२२ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरुपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरुपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर "ना हरकत प्रमाणपत्र" देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**(स्वाक्षरी)**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
सिडको/जनसंपर्क/३६२/२०२२-२३


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## कोकणकन्या एक्स्प्रेसमधून ६ लाख रुपये किमतीच्या दागिन्यांची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिंधुदुर्ग येथून मुंबई रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिलेच्या बॅगमधून चोरट्यांनी सहा लाखांचे दागिने चोरल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल रेल्वे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल 'करण्यात आला आहे.

बोरिवली येथे राहणाऱ्या माधुरी गवस (६०) ह्या मुंबईत त्यांच्या मैत्रिणीच्या मुलाच्या लग्नाचे रिसेप्शनसाठी कोकणकन्या एक्स्प्रेसने मुंबईला येत होत्या. यावेळी लग्नात वापरण्यासाठी त्यांनी ६ लाख रुपये किमतीचे सोन्याचे मौल्यवान दागिने सोबत आणले होते. त्यांची रेल्वे पनवेल स्थानकात पोहोचली असता त्यांना त्यांच्या बॅगची चेन उघडी आढळून आली. यामुळे त्यांनी बॅग तपासली असता, त्यामधील दागिन्यांची पर्स आढळून आली नाही. याप्रकरणी पनवेल रेल्वे पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## कोलाड विभागीय कबड्डी स्पर्धेत भुवण संघ ठरला अंतिम विजेता

**दै.रायगड नगरी । रोहा**

कोलाड कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेने व गावदेवी क्रीडा मंडळ बाहे यांच्या वतीने संपन्न करण्यात आलेल्या कोलाड विभागिय कबड्डी स्पर्धेत अंतिम सामन्यात भुवण संघाने सर्वोत्तम कामगिरी करून अंतिम विजेतेपद पटकावले.

या स्पर्धेचै उद्घाटन ओबीसी समन्वय समितीचे अध्यक्ष अनंत थिटे व उद्योजक शंकर महाबळे यांच्या हस्ते करण्यात आलेल्या या स्पर्धेप्रसंगी मनोज बामणे, अनिल जाधव, राकेश देवकर, कल्पेश बामुगडे, दिनेश माटल आदींसह मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कबड्ढी खेळ व खेळाडू यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने कोलाड विभाग कबड्डी असोसिएशन यांच्या वतीने सदरचे कबड्डी सामने असोसिएशनशी संलग्न असणाऱ्या गावांमध्ये आयोजित करण्यात येत आहेत.त्याच उद्देशाने संपन्न करण्यात आलेल्या या स्पर्धेतील उपविजेतेपद पाटणूस संघाने पटकावले तर धाक्सूद चिल्हे व काळभैरव पाले ब या संघांना तृतीय आणि चतुर्थ क्रमांकावर समाधान मानावे लागले.

सामनावीर अमन साळवी भूवण, उत्कृष्ट चढाई सनी कोठेकर चिल्हे तर उत्कृष्ट पक्कड म्हणून करण म्हामूणकर पाटणूस यांना उपस्थित मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी गावदेवी क्रीडा मंडळ बाहे येथील सर्व सदस्य यांनी मोलाचे सहकार्य केले.


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# शिक्षकांच्या विविध समस्या प्रलंबित असल्याने जिल्हा परिषदेच्या कारभारावर शिक्षक वर्ग नाराज

### मागण्या मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**दै.रायगड नगरी । उरण**

प्राथमिक शिक्षकांच्या अ प्रमाणपत्र याद्या फक्त महाड, पोलादपूर व रोहा येथीलच प्रसिद्ध झालेल्या आहेत. रायगड जिल्ह्यातील इतर तालुक्यातील याद्या प्रसिद्ध झालेल्या नाहीत. त्यामुळे इतर तालुक्यातील उर्वरित याद्या कोणत्या कारणासाठी प्रसिद्ध केले जात नाहीत याची चौकशी व्हावी तसेच वरिष्ठ वेतन श्रेणी याद्या मागील त्रुटी असलेल्या ५५ जणांचे प्रस्ताव व नवीन यादी त्वरित प्रसिद्ध करावे. या मागणीसाठी संपूर्ण रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील शिक्षक रायगड जिल्हा परिषदेतील शिक्षण विभागात शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांच्याकडे अनेकवेळा फेऱ्या मारत आहेत. शिक्षक आपल्या विविध मागण्यासाठी शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांच्याकडे पाठपुरावा करत आहेत मात्र शिक्षकांच्या मागण्या मान्य होत नसल्याने तसेच शिक्षकांशी संबंधित विविध समस्या प्रलंबित असल्याने शिक्षक वर्गातून मोठी नाराजी व्यक्त केली जात आहे.

रायगड जिल्हा परिषदेमध्ये प्रथम रुजू झाल्यापासून ते ३ वर्षे सेवा झाल्यानंतर त्या शिक्षकांना स्थायी सेवेत सामावून घेतले जाते.मात्र रायगड जिल्ह्यात ३ वर्षे सेवा पूर्ण केलेल्या शिक्षकांनी स्थायी शासकीय कर्मचारी म्हणून प्रस्ताव शिक्षणाधिकारी यांच्याकडे पाठवून सुद्धा शिक्षकांचे प्रस्ताव निकाली न काढल्याने शिक्षकांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच निवृत्तीला आलेले कर्मचारीही कायम सेवेच्या प्रतीक्षेत आहेत. त्यांनीही रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

रायगड जिल्हा परिषद शाळांमध्ये हजारो शिक्षक ज्ञानदानाचे काम करीत आहेत. जिल्ह्यात शिक्षक सेवेत ज्या शिक्षकांना ३ वर्षे पूर्ण झाली आहेत त्या त्या शिक्षकांना स्थायी कर्मचारी म्हणून पात्र ठरविले जाते. स्थायी प्रमाणपत्रची शिक्षकांना नितांत गरज असते. सेवा पुस्तिका व जिल्ह्या बाहेरील बदली झालेल्या शिक्षकांना स्थायी प्रमाणपत्र गरजेचे आहे. तीन वर्षाचे सेवा पूर्ण झाल्यानंतर शिक्षकांना स्थायीत्व प्रमाणपत्र देणे हे शिक्षण विभागाचे प्रशासकीय काम आहे. मात्र त्याकडे शिक्षण विभागाचे जाणून बुजून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप शिक्षक वर्गामधून केला जात आहे.

महाराष्ट्र शिक्षणाचा ११ ऑक्टोबर २०१४ रोजीच्या निर्णयानुसार तीन वर्षाचे नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांस स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात येते. यामध्ये प्रामुख्याने कर्मचाऱ्यांची नियुक्ती सेवा प्रवेश नियमानुसार व विहित पद्धतीने झालेली असणे आवश्यक आहे. तसेच कर्मचारी सेवेत पात्र असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र व त्याचबरोबर कर्मचाऱ्यांने सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल, उपस्थिती, सचोटी चांगली असणे आवश्यक आहे. परंतु रायगड जिल्हा परिषदेमध्ये कर्मचारी निवृत्तीला आलेले असतानाही अद्यापही शिक्षकांना स्थायित्व प्रमाणपत्रापासून वंचित ठेवण्यात आले आहेत. जिल्हा परिषदेतील शिक्षण विभागात चालणाऱ्या या भोंगळ कारभाराची चौकशी केली जावी अशी मागणी शिक्षक वर्गांनी केली आहे. या सर्व प्रकरणात आर्थिक हीत संबंध गुंतले आहेत का ? असा सवाल शिक्षक वर्गातून उपस्थित केला जात आहे.याचीही चौकशी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्याधिकारी डॉ किरण पाटील यांनी करावे अशी मागणीहि शिक्षक वर्गातून होऊ लागली आहे.

# शीव-पनवेल महामार्गावरील पथदिव्यांसाठी बांधकाम विभागाने दिले पालिकेला आठ कोटींचा निधी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर शीव-पनवेल महामार्गावरील खारघर ते कळंबोली मार्गावरील पथदिवे अनेक महिन्यांपासून बंद असल्याने महामार्गावर अंधाराचे जाळे आहे. त्यामुळे या मार्गावरली प्रवास धोक्याचा झाला आहे. पथदिवे देखभाल-दुरुस्तीसाठी लागणारा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाने देण्याची मागणी पनवेल पालिकेने केली होती. त्यानुसार बांधकाम विभागाने पालिकेला आठ कोटींचा निधी हस्तांतर केला असून या मार्गाला लवकरच झळाळी प्राप्त होणार आहे.

शीव-पनवेल महामार्गावरील पथदिवे अनेक महिन्यांपासून बंद आहेत. निधीअभावी महामार्गावरील पथदिवे त्याचबरोबर सिग्नल यंत्रणा देखभाल-दुरुस्त करणे सार्वजनिक बांधकाम विभागाला दुरापास्त झालेहोते. अंधारामुळे योग्य अंदाज येत नसल्याने किरकोळ अपघाताच्या घटना घडल्याने प्रवासी वर्गात नाराजी होती.

महामार्गावरील पथदिवे देखभाल व दुरुस्तीसाठी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून महापालिकेकडे हस्तांतरित करण्यात यावेत, अशा प्रकारचे आदेश सरकारकडून निर्गमित करण्यात आले. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नवी मुंबई महापालिका आणि पनवेल महापालिकेकडे पत्रव्यवहार करून पथदिवे स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरीत करण्याची विनंती केली होती; मात्र पनवेल महापालिकेने सीबीडी भारती विद्यापीठ ते कळंबोली जंक्शन यादरम्यानचे पथदिवे देखभाल- दुरुस्तीसाठी लागणारा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाने द्यावा, असे पत्र दिले होते. त्यानुसार बांधकाम विभागाने पालिकेला आठ कोटींचा निधी हस्तांतर केला असून बंद पथदिव्यांच्या दुरुस्तीला लवकरच सुरुवात होणार आहे.

# महापालिका शाळांमध्ये मानवी हक्क दिनानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पनवेल महापालिकेच्या ११ शाळांमध्ये मानवी हक्क दिनानिमित्ताने निबंध स्पर्धा, व्याख्यान, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

आज दिनांक १० डिसेंबर हा मानवी हक्क दिन म्हणून साजरा करण्यात येतो. मानवी हक्काबाबत जनजागृती करणे हा राज्य मानवी हक्क आयोगाचा महत्वपूर्ण अविभाज्य भाग आहे. या कायद्याअंतर्गत समाजातील तळागाळापर्यंत जनतेला मानवी हक्काविषयी माहिती होणे व त्याबद्दल जनजागृती होण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे आदेश आयुक्त गणेश देशमुख यांनी दिले होते.

त्यानूसार उपायुक्त गणेश शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेच्या दि.बा पाटील शाळा तसेच दगडी शाळेमध्ये व्याख्यानाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना पत्रकार नूतन पाटील यांनी मानवी हक्काविषयी माहिती दिली. यावर्षीची मानवी हक्क दिनाची घोषणा Dignity Freedom and Justice for all आहे. ही घोषणा यावेळी मुलांनी दिली. तसेच यावर्षीचा कृती संदेश Stand Up For Human Rights असा आहे.

तसेच पनवेल महानगरपालिका शाळा क्र. ०५ मोठा खांदा येथे 'मानवी हक्कदिनानिमित्त 'अँड सुजाता चव्हाण (सदस्य इनरव्हील क्लब) यांच्या व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गुजराती शाळा,पोदी येथील शाळेमध्ये चित्रकला स्पर्धा, पोस्टर स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्यांना बक्षिसे वितरीत करण्यात आले. या कार्यक्रमासाठी ११शाळेतील मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी मेहनत घेतली.

# माथेरानच्या मुख्य रस्त्यांच्या कामांना गती

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान साठी मागील काळात १२३ कोटी रुपयांचा भरीव निधी उपलब्ध झाला होता त्यातील ४३ कोटी रुपये हे माथेरानचे मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी नाक्यापासून ते छत्रपती शिव-ाजी महाराज रोड पर्यंत क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांसाठी खर्च करण्यात येत आहेत. ही कामे एमएमआरडीए च्या माध्यमातून पूर्ण केली जात असून या मुख्य रस्त्यांचे काम सध्यातरी युद्धपातळीवर सुरू आहे.

मुख्य रस्त्यावर सर्व व्यापारी, दुकानदार यांना धुळीच्या त्रासाला अनेक वर्षांपासून सामोरे जावे लागत होते. त्यामुळे हे रस्ते धुळविरहित असावेत ही त्यांची मागणी होती त्यानुसार माथेरान या पर्यावरण दृष्ट्या अतिसंवेदनशील क्षेत्रात सनियंत्रण समितीच्या परवानगीने क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांना मान्यता देण्यात आली आहे त्याप्रमाणे ही कामे नियमानुसारच सुरू आहेत. मागील काही वर्षांपूर्वी याच मुख्य रस्त्यावर पेव्हर ब्लॉक लावण्यात आले होते परंतु घोडे घसरतात याकारणाने घोड्याना चालण्यासाठी मधला भाग केवळ घोड्यांना चालण्यासाठी ठेवण्यात आला होता परंतु सद्यस्थितीत हेच घोडे पेव्हर ब्लॉकवर चालत असतात आणि नागरिक, पर्यटकांना लाल मातीच्या रस्त्यातून मार्ग काढावा लागत होता. अतिवृष्टीमुळे या मधल्या भागातील रस्त्यांची अक्षरशः एखाद्या नाल्याप्रमाणे परिस्थिती झाली असून अर्धा ते एक फूट हा रस्ता खाली गेला आहे. क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांच्या कामांना आता गती मिळाली असून युद्धपातळीवर सध्या या रस्त्यांची कामे सुरू आहेत.

शनिवार आणि रविवार या दिवशी सुट्ट्यांचा हंगाम लक्षात घेता पर्यटकांची वाहतूक करणाऱ्या व्यावसायिकांना कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होऊ नये यासाठी दोन दिवस ही कामे धीम्या गतीने सुरू ठेवली आहेत.वर्षाअखेर ही ब्लॉकची कामे नियोजित ठिकाणापर्यंत पुर्ण होण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने कामांना गती दिली जात आहे.

या रस्त्यांमुळे व्यापारी वर्गाला यापुढे धुळीचा सामना करावा लागणार नसल्याने त्यांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. त्याचप्रमाणे पर्यटकांना सुध्दा चालण्यासाठी हा एक उत्तम पर्याय उपलब्ध झाला असून आपले सामान सुद्धा अगदी सहजपणे ओढून नेऊ शकतात.

# कर्जत तालुक्यातील शिवसेना (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे पदाधिकारी जाहीर

**दै.रायगड नगरी । कर्जत**




कर्जत नगरपरिषद गटनेते तथा नगर-सेवक नितीन सावंत यांची उपजिल्हाप्रमुख म्हणून निवड झाल्यापासून कर्जत खालापूर येथे पक्षाला बळकटी देण्यासाठी नव्याने पदाधिकाऱ्यांची नेमणुका तसेच दोन्ही तालुक्यातील अनेक पक्षप्रवेश शिवालय शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात सातत्याने सुरू आहेत.

आज देखील पदाधिकाऱ्यांच्या नेमणुका होत असतांना उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, महिला संघटक सुवर्णा जोशी, तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, संपर्कप्रमुख सुदाम पवाळी, संघटक बाबू घारे, महिला संघटक करुणा बडेकर, युवासेना कर्जत तालुका अधिकारी प्रथमेश मोरे, कर्जत तालुका युवासेना सचिव ॲड.संपत हडप, युवासेना सह समन्वयक संदीप कोळंबे, उपतालुका प्रमुख दशरथ भगत, रामदास घरत, सुरेश गोमारे, नितीन धुळे, उपतालुका संघटक सुधाकर देसाई, दिनेश देशमुख, विभागप्रमुख योगेश दाभाडे, लक्ष्मण पोसाटे, कुमार बोराडे, पंचायत समिती विभागप्रमुख संतोष राणे, भगवान बांगर, मंगेश राऊत, मिलिंद सोनावळे, परेश काळण, योगेश घोलप, माजी सभापती प्रदीप ठाकरे, पंढरीनाथ राऊत, सुजाता मनवे, नेरळ माजी शहरप्रमुख रोहिदास मोरे, जेष्ठ शिवसैनिक माधव कोळंबे, नगरसेविका प्राची डेरवणकर, शाखाप्रमुख समीर साळोखे शिवसेना, युवासेना आणि महिला आघाडीचे अनेक पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत होते.

कर्जत तालुक्यातील पदाधिकारी जाहीर करण्यात आले. शिवसेना कर्जत तालुका सचिव रामदास भगत, कर्जत तालुका सहसंपर्क प्रमुख अविनाश भासे, उपतालुका प्रमुख दिनेश भोईर,पाथरज जिल्हापरिषद संघटक संतोष घाडगे, उमरोली पंचायत समिती विभागप्रमुख दिनेश भासे, कशेळे पंचायत समिती गणेश मोडक, शेलू पंचायत समिती संघटक विष्णू जामघरे, बीड - १ शाखाप्रमुख संतोष घारे, पोशिर शाखाप्रमुख गणपत हाबळे, भडवळ शाखाप्रमुख जयदीप पाटील, भडवळ धनगरवाडा शाखाप्रमुख जगन्नाथ आखाडे, पोशिर उप शाखाप्रमुख अरुण राणे, भडवळ वाडी शाखाप्रमुख चंद्रकांत वाघ, भडवळ उप शाखाप्रमुख गणेश पाटील, सुभाष म्हसकर, भडवळवाडी उप शाखाप्रमुख प्रकाश शिंगवा, सीताराम केंगे यांची नेमणूक करण्यात आली.

युवासेना उपतालुका अधिकारी ऋषिकेश सोनावळे, कर्जत तालुका सहसमन्वयक संतोष शेळके, पोशिर पंचायत समिती युवाधिकारी विशाल तुपे, युवासेना शेलू पंचायत समिती संघटक हरेष कराळे, पोशिर युवासेना शाखाधिकारी विलास विरले, भडवळ युवासेना शाखा अधिकारी राकेश झोमटे, डिकसळ युवासेना शाखाधिकारी संकेत शेळके, डिकसळ युवासेना उप शाखाधिकारी मनोज गायकवाड, डिकसळ युवासेना संघटक केतन पाटील, डिकसल युवासेना सहसंघटक प्रथमेश साळोखे, डिकसळ युवासेना समन्वयक प्रवीण म्हसे, डिकसळ युवासेना सहसमन्वयक तेजस कुंभार, तालुका संपर्क संघटक सुमन लोंगले ग्रामीण, तालुका समन्वयक ग्रामीण अंजली शिंदे, उप तालुका संघटक सावळे करीना कोळंबे, उपतालुका संघटक पाथरज मनीषा म्हसे, उपतालुका संघटक बीड दीपा रुठे, पंचायत समिती विभाग संघटक शेलू अंकिता मिणमिणे, शहर समन्वयक दहिवली विभाग अरुणा मोरे, शहर संपर्क दहिवली आकुर्ले विभाग सरिता मोरे, विभाग संघटक अकुर्ले भाविका भुरे, शहर संपर्क संघटक गुंडगे भिसेगाव सारिका शेट्टी, संघटक मुद्रे विभाग मयुरी गजमल शहर, विभाग संघटक मुद्रे गीता पळसकर, उपविभाग संघटक आकुर्ले मानसी मांडवकर आदींची नेमणूक करण्यात आल्या आहेत.

# ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शस्त्रपरवाना धारकांना शस्त्र जमा करण्याचे आदेश

**दै.रायगड नगरी । उरण**

नवीमुंबई पोलिस आयुक्त हद्दीत होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उरण, पनवेल, नवीन पनवेलमधील ४३ शस्त्रपरवाना धारकांना बंदुक, पिस्तूल पोलिस ठाण्यात जमा करण्यासाठी पोलिसांनी नोटीसा बजावल्या आहेत. उरण तालुक्यातील १७ आणि पनवेल तालुक्यातील २३ अशा एकूण ४० ग्रामपंचायतींच्या निवडणुका १८ डिसेंबर रोजी होणार आहेत.मतदानानंतर २० डिसेंबर रोजी मतमोजणीस सुरुवात केली जाणार आहे.

मतदान आणि मतमोजणी दरम्यान कुठेही शांतता भंग होणार नाही आणि कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी खबरदारीची उपाययोजना म्हणून उरण आणि पनवेल तालुक्यातील निवडणूक प्रक्रिया सुरू असलेल्या ग्रामपंचायतींच्या हद्दीत असलेल्या ४३ शस्त्रपरवाना धारकांना आपल्याकडील बंदुक, पिस्तूल पोलिस ठाण्यात जमा करण्यासाठी पोलिसांनी नोटीसा बजावल्या आहेत.

यामध्ये उरण -१३, पनवेल - ७ आणि नवीन पनवेलमधील २३ अशा एकूण ४३ शस्त्रपरवाना धारकांना बंदुक, पिस्तूल पोलिस ठाण्यात जमा करण्यासाठी पोलिसांनी नोटीसा बजावल्या आल्या आहेत. यापैकी बहुतांश शस्त्र परवानाधारकांनी आपापली शस्त्रे पोलिस ठाण्यात जमा केली आहेत.उर्वरित शस्त्रे जमा करण्याची कारवाई सुरू असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली आहे.

# माथेरानमध्ये जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । माथेरान**

जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त विविध कार्यक्रम वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यालय आणि प्राचार्य गव्हाणकर विद्यालय यांचे वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

जागतिक मानवी हक्क दिन माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेचे, वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यामंदिर, माथेरान प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर, माथेरान या दोन्हीही शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रमात सहभाग नोंदवला. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला नगरपरिषदेच्या प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे (शिंदे) यांनी पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली यावेळी संविधान त्याचप्रमाणे मानवाने माणसाशी कशी वर्तणूक केली पाहिजे आपले आचार ,विचार,समाजात आपली वर्तणूक आणि सामाजिक बांधिलकी जोपासताना आपली काय जबाबदारी असते आपले कर्तव्य पार पाडत असताना जनहितार्थ जी सेवा घडते त्यातूनच अंतरी समाधान प्राप्त होते. असे अनमोल विचार यानिमित्ताने प्रशासक सुरेखा भणगे, शिक्षक संघपाल वाठोरे, दिलीप अहिरे यांनी नमूद केले. याप्रसंगी सुत्र संचालन संघपाल वाठोरे यांनी केले.

आभार प्रदर्शन शिक्षक रमेश ढोले यांनी केले. यावेळी प्राथमिक शाळेचे शिक्षक दिलीप आहिरे, सचिन भोईर, अनिश पाटील, साक्षी कदम, गव्हाणकर शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना पाटील, रमेश ढोले, दिनेश बागवे, विदुला गोसावी यांसह नगरपरिषदेचे कर्मचारी, अधिकारी राजेश रांजाणे, प्रविण सुर्वे, अंकुश इचके, अजय साळूंखे, जयवंत वर्तक, सदानंद इंगळे, अन्सार शेख, अभिमन्यू येळवंडे, वनिता डिघे, परिचारिका गोळे, शालेय विद्यार्थी, नगरपरिषदचे सर्व अधिकारी, कर्मचारी आणि शिक्षकवृंद, नागरिक, पालकवर्ग उपस्थित होते.

